## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -६८/२०१९/सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे

| तक्रारदार | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलिय अधिकारी तथा |
|---|---|---|
| किरण मुरलीधर घाडगे | सहाय्यक पोलीस आयुक्त, चतुःश्रृंगी विभाग, पुणे शहर, ब्रेमेन चौक, औंध पोलीस चौकीसमोर, औध, पुणे. | पोलीस उपायुक्त परिमंडळ -३, पुणे शहर, जुना पुणे - मुंबई रॉड, प्रीमियर कंपनी शेजारी, कॉसमास, बँकेच्या पाठीमागे, चिंचवड स्टेशन, पुणे. |

(आदेश दिनांक-१९.०५.२०२६)

तक्रारदार यांचा कलम-१८ अंतर्गत तक्रार अर्ज दि.२५.०२.२०१९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झाला आहे. तक्रारदार यांनी या तक्रार अर्जाद्वारे द्वितीय अपील क्र. २७०१+२७०२+२७०३+२७०५+२७०७+२७१५/२०१६/सोलापूर या प्रकरणी आयोगाचे आदेशानुसार अद्याप माहिती दिली नाही अशी तक्रार केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे आणि त्यानुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणानी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग, तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

सदर तक्रार अर्जाशी संबंधित व्दितीय अपील क्र. २७०१+२७०२+२७०३+२७०५+२७०७+२७१५/२०१६/सोलापूर यामध्ये आयोगाने दिनांक २२.०३.२०१८ व ०५.०६.२०१८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला आहे. प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

सदर प्रकरणात जन माहीती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतुःश्रृंगी विभाग, पुणे शहर, ब्रेमेन चौक, औंध पोलीस चौकीसमोर, औध, पुणे. यांना सूचित करण्यात येते की त्यांनी वर नमूद द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात कार्यवाही करावी व तसे तक्रारदार यांना कळवावे.

**आदेश**

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे

तक्रार क्रमांक - ६८/२०१९/सोलापूर जावक.क्र - 2514 दिनांक 1/6/2026